राष्ट्रसंत तुकडोजी रिजनल कॅन्सर केअर सेंटर,नागपूर येथे लिनिअर एक्सलरेटर खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २०१६/ प्रक्र-१७८/आरोग्य ३(अ)
गो.ते.संकुल इमारत, १० वा मजला, ए विंग,
मंत्रालय, एल.टी.मार्ग, मुंबई-४०० ००१.
दिनांक: १८ ऑक्टोबर,२०१७.

संदर्भ:-

१) संचालक,आरोग्यसेवा यांचे क्र.संआसे / NCD / RST / वैयोप्रस्ताव़ / ३४१६ / २०१६ , दि.१०.५.२०१६चे पत्र.
२) आयुक्त, आरोग्य सेवा यांचे क्र.संआसे /NCD /योजनेतर योजना /२७५, दि.२०.५.२०१७ चे पत्र

प्रस्तावना :-

" राष्ट्रीय कर्करोग,मधुमेह,हृदयरोग,व पक्षाघात प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रम या केंद्र पुरस्कृत योजनें अंतर्गत (NPCDCS) राज्यात कर्करोग उपचाराच्या सुविधांमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीकोनातून केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार SCI (State Cancer Institute) व TCCC (Tertiary care cancer centre) उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज रिजनल कॅन्सर केअर सेंटर, नागपूर येथे TCCC स्थापन करण्याच्या प्रस्तावास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. सदर योजनेंतर्गत TCCC सेंटरसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी एकूण ४५ कोटी इतके अर्थसहाय्य प्रत्येक TCCC सेंटरला उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. यापैकी ६०% इतक्या केंद्र हिश्श्याची रक्कम केंद्र शासनामार्फत मिळणार असून ४० % निधी राज्य शासनाने द्यावयाचा आहे. केंद्र शासनाच्या ६०% हिश्श्याच्या रकमेच्या पहिल्या हप्त्याचा निधी GENERAL,TSP,SCSP या उद्दिष्टासाठी केंद्र शासनाच्या दि.१३.१.२०१७ च्या आदेशान्वये प्राप्त झालेला आहे.

उपरोक्त निधी व्यतिरिक्त राष्ट्रसंत तुकडोजी कॅन्सर हॉस्पिटल, नागपूरसाठी लिनिअर एक्सलेटर खरेदी करण्यासाठी वैशिष्टयेपुर्ण योजनेंतर्गत रुपये १०.०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्याबाबतच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने आता खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

शासन निर्णय:-

राष्ट्रसंत तुकडोजी रिजनल कॅन्सर केअर सेंटर, नागपूर येथे लिनिअर एक्सलरेटर मशीन खरेदी करण्यासाठी रु.१०.०० कोटी इतक्या रकमेचे एकवेळचे अनुदान सदर संस्थेस उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावास खालील बाबींच्या अधीनतेने प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

१) राष्ट्रसंत तुकडोजी कॅन्सर हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, नागपूर साठी लिनिअर एक्सलेटर मशीन खरेदी करतांना विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन खरेदी प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी. खरेदी प्रक्रियेत कोणतीही अनियमितता होणार नाही याची काळजी घ्यावी. राष्ट्रसंत तुकडोजी रिजनल

कॅन्सर केअर सेंटर, नागपूर यांनी खरेदी प्रक्रिया करतांना त्यांच्या खरेदी समितीमध्ये अतिरिक्त संचालक,आरोग्य सेवा (असंक) आरोग्य सेवा संचालनालय यांचा समावेश करावा.

२) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सर हॉस्पिटल, नागपूर या संस्थेस दिलेल्या या निधीतून खरेदी करण्यात आलेल्या लिनिअर एक्सलेटर सुविधेचा लाभ ४०% गरीब रुग्णांना मोफत कँसर उपचारासाठी उपलब्ध करुन देण्यात यावा. सदर रक्कम उपरोक्त संस्थेस अदा करण्यापूर्वी संचालक, आरोग्य सेवा यांनी आवश्यक करारनामा संबंधित रुग्णालयासोबत करावा.

सदर प्रस्तावावरील खर्च २२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०१ - नागरी आरोग्य सेवा विषम चिकित्सा ग्रामीण आरोग्य सेवा,११०, रुग्णालये व दवाखाने,११० (४) मुफसल रुग्णालये व दवाखाने यांना सहायक अनुदान, ३१ सहायक अनुदाने (२२१० ०१७३) खाजगी स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदान या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागविण्यात येईल.

हे आदेश, शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक- विअप्र २०१३/प्र.क्र.३०/विनियम, दिनांक १७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्ट, वित्तीय अधिकार पुस्तिका भाग पहिला,उपविभाग तीन,अ.क्र.४ परिच्छेद क्र.२७ (२) अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन तसेच वित्त विभागांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३२७/२०१७/व्यय-१३ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१८१७१०१९६९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shamraoji Kaurte

Digitally signed by Rajendra Shamraoji Kaurte
DN: CN = Rajendra Shamraoji Kaurte, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2017.10.18 17:53:25 +05'30'

(रा.शा.कौरते)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल, (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२-नागपूर.
२. खाजगी सचिव,मा.मंत्री सार्वजनिक आरोग्य , मंत्रालय,मुंबई
३. खाजगी सचिव,मा.राज्यमंत्री,सार्वजनिक आरोग्य,मंत्रालय,मुंबई
४. मा.विरोधी पक्षनेता,विधानसभा/विधानपरिषद,विधानमंडळ,मुंबई
५. आयुक्त,आरोग्य सेवा तथा संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई
६. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
७. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (असंक), मुंबई
८. उप संचालक,आरोग्य सेवा, नागपूर मंडळ,नागपूर
९. जिल्हा कोषागार अधिकारी,नागपूर

१०. संचालक,राष्ट्रसंत तुकडोजी रिजनल कॅंसर हॉस्पीटल अँड रिसर्च सेंटर,तुकडोजी चौक,मानेवाडा रोड, नागपूर-४४००२७
११. कार्यासन अधिकारी,नियोजन विभाग (का-१४७२), मंत्रालय, मुंबई.
१२. कार्यासन अधिकारी,वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. अवर सचिव (अर्थसंकल्प), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. निवडनस्ती (आरोग्य-३अ).